

संकरित टोमॅटो

प्रकरण दुसरे.

# पंचवार्षिक योजनेतील भारतीय शेतीचा विकास

## प्रकरण दुसरे.

## पंचवार्षिक योजनेतील भारतीय शेतीचा विकास.

**१] प्रस्तावना:-**

भारतातआर्थिक नियोजन सुरु होण्या पूर्वी भारतातील कर्त्या लोकसंख्ये पैकी सुमारे ७० टक्के लोक शेती व्यवसायात काम करीत असून ही त्या काळातील शेती व्यवसायातील श्रमिकांची कार्यक्षमता अल्प राहिल्याने अन्न-धान्याची आयात करणे भाग पडत असे. शेती व्यवसायाची उत्पादकता वाढवून त्या व्यवसायाचा विकास घडवून आणण्याचे योजनबध्द प्रयत्न सन १९५१ पासून सुरु झाले.

दि. १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ताबडतोब भारताच्या फाळणीचा प्रश्न आणि निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवणे भाग पडले सन १९४८ मध्ये काश्मीरच्या प्रश्नावर पाकिस्तानाशी लढा देणे भारताला भाग पडले. स्वातंत्र प्राप्ती नंतरच्या दोन-तीन वर्षाच्या काळात या प्रश्नावर व राज्य-घटना तयार करण्यावर लक्ष केंद्रीत करणे भाग पडले म्हणून त्या काळात योजना बध्द आर्थिक विकासाचे प्रयत्न सुरु करता आले नाहीत. त्यानंतर १९५० मध्ये योजना आयोगाची नेमणुक करण्यात आली आणि भारताची पहिली पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९५१ पासून सुरु करण्यात आल.

**२] जमीनविषय सुधारणा:**

शेतीच्या उत्पादनतंत्रात सुधारणा करुन शेतकी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करणे हा पहिल्या पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत असलेल्या शेती विषयक सुधारणांचा एक भाग झाला दुसरा व त्याहून महत्वाचा भाग म्हणजे शेती संघटनात महत्वाच्या व मुलगामी सुधारणा करणे हा होय. भु-सुधारणा पध्दतीत सुधारणा करुन प्रत्यक्ष जोमन कसणा-याला शेतीचा मालक करण व शतकरी वर्ग आणि राज्यसंस्था ह्याच्यामधील मध्यस्थानचे उच्चाटन करुन शेत-याचा राज्य संस्थेशी साक्षात संबंध जोडणे भु-धारणेतील विषयता कमी करणे व शक्य असेल तिथे सहकारी शेतीचा स्वीकार करणे ह्या सुधारणा केल्या जाव्यात पण त्या करते वेळी शेतकी उत्पादन कि वाढविण्याच्या प्रयत्नाला बाधा येणार नाही अशी दक्षता घ्यावी.

**२.१] मध्ये स्थांचे उच्चाटन :**

मध्येस्थांचे उच्चाटन करण्याचा कार्यक्रम पहिल्या पंचवार्षिक योजनेत अत्यंत व्यवस्थित रीत्या पार पडला पहिल्या योजनेची ही सर्वात मोठी कामगीरी होय ह्यांत बिलकुल शंका नाही. जमीनदारी व रयतवारी ह्या भु-धारणेच्या दोन पध्दती पैकी रयतवरीत सरकार व शेतकरी ह्याच्यांत प्रत्यक्ष संबंध असतो जमीनदारीत सरकार व शेतकरी

हयाच्यात प्रत्यक्ष संबंध असतो जमीनारीत मात्र जमिनदार हा राज्यसंस्था व शेतकरी यांच्यातील मध्यस्थ असतो. त्यामुळे जमिदारीची पध्दतीचे निर्मूलन करणे व मध्यस्थाचे उच्चाटन करणे आणि प्रतवरी प्रस्तापीत करणे तसे केल्यास सुधारणाची जी पध्दती अस्थित्वांत येते तिलाच शेतकरी मालक पध्दती हया पध्दतीत जमिनदार हाच तिचा मालक असतो व मालक हया नात्याने त्याचाच सरकारची संबंध असतो शेतसारा भरण्याची सर्व जबाबदारी कायदयाने त्यांच्यावर असते.

२.२] जमीनदारी निर्मूलनाचे कायदे:-

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जमीनदारी निर्मूलनाच्या झपाटयाने प्रगती झाली.योजनेच्या अखेर जीमनदारीचे जवळजवळ संपूर्ण पणे उच्चाटन झाले होते असे म्हणण्यास हरकत नाही. बहुतेक प्रत्येक राज्यांत जमीनदारी निर्मूलनाचा किंवा अनुपस्थित मालकी नष्ट करण्याचा कायदा करावा लागला हयावरुन त्या पध्दतीचा भारतात किती प्रसार झाला हे कळून येईल.

जमीनदारांनी घावयाची नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याच्या बाबतीत आणि ती रक्कम कोणत्या पध्दतीने घावयाची या संबंधीच्या तरतुदी निरनिराळ्या घटक राज्यांत निरनिराळ्या असल्याचे आढळते. नुकसानभरपाईचे दर शेतीवाडीपासून मिळणा-या निव्वळ अत्पन्नांच्या ८ते१० पट रक्केमेच्या आधारावर निश्चित करण्यात आले सर्व देशाच्या दृष्टीने पहाता जमीनदारी निर्मूलनाचा एकूण बोजा किती हा प्रश्न महत्वाचा आहे. नियोजन महासमितीने ६१५ कोटीचा बोजा देशावर पडला असा अ अदांज केला आहे. त्यांत प्रत्यक्ष नुकसानभरपाई ३७९ कोटी, ११५ कोटी व्याज [जेथे हप्त्याने किंवाकर्ज रोख्यांच्या स्वरुपात नुकसान भरपाई दिली तेथे व्याज घावे लागले] व ८६ कोटी पुनर्वसन अनुदान .

२.३] कुळांच्या हक्कासंबंधी सुधारणा:

जमिनदारी पध्दत रद्द केली गेली तरीही काही कारणांमुळे कुळवहिवाट पध्दती अस्थित्वात राहतेच विधवा, वृध्दव्यक्ती, अपंग व्यक्ती अज्ञान व्यक्ती, संरक्षण दलातील लोक वगैरेंना त्यांच्या जमिनी कुळांकडून कसून घेण्यास परवानगी दिली. पाहिजे.धारणक्षेत्रावर कमाल मर्यादा घातली गेली तरी एखाधा लहान कुटुंबाला ती सर्व जमिन स्वत: कसणे शक्य होईल असे नाही अशा परिस्थीतीत जमीन खंडाने कसण्यासाठी कुळांकडे देणे योग्य ठरते. त्याचप्रमाणे जी लहान आकाराच्या जमिनीचा मालक आहे. अशा जमीनमालकाला एखाधा बिबर शेती व्यवसायात प्रवेश करावयाचा असेल तरत्याला त्याची जमीन एखाधा कुळांकडून कसून घेण्यास परवानगी देणे योग्य ठरते.

आशा रितीने जमीन खंडाने करण्यासाठी यावर पूर्ण बंदी घालणे सामाजिक दृष्टया इष्ट नसते आणि प्रशासकीय दृष्टया शक्य नसते अशा परिस्थितीत शेतीच्या कुळवहिवाट पध्दतीचे दोष शक्य तितके कमी करणे आवश्यक ठरते आणि प्रत्यक्षात तसे केले जात आहेत.

पुढील तिन गोष्टीचा समावेश कुळांच्या हक्कसंबंधी सुधारणा मध्ये केल्या गेल्या पाहिजेत १] कुळांनी जमीनमालकांकडे करणा करावयाच्या योग्य खंडाची निश्चिती २] कुळांच्या जमीन करण्याचा संबंधीची हक्कांची सुरक्षितता ३] काही विशिष्ट परिस्थीत कुळांना जमिनीचे मालकी हक्क बहाल करणे.

२.४] धारणक्षेत्रावरील कमाल मर्यादा:

शेतीव्यवसायात नवी उधोगविधा वापरण्यात यशस्वी रितीने सुरुवात झाल्यामुळे शेतीव्यवसायाच्या उत्पादकतेत विशेषत: सन १९६७ ते १९७५ ह्या कालखंडात बरीच वाढ झाल्याचे दिसून येते. शेतीच्या उत्पादकतेमुळे आणि शेतीमालाच्या वाढत्या किंमतीमुळे जमिनीच्या किंमती आणि जमिनीपासून मिळणारे वार्षिक द्रव्यरुप उत्पन्न ह्यामध्ये बरीच वाढ घडून आली ह्या परिस्थिमुळे काही गंभीर स्वरुपाच्या व अनिष्ट प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत वैयक्तिक शेतीची सबब पुढे करुन किंवा सामाजिक व राजकीय दडपण आणून फार पूर्वीपासून जमीन कसण्याचे काम करीत आलेल्या कुळांनी जमीन मालकांकडून मोठया प्रमाणावर हकालपट्टी करण्यात आली तसेच लहान व सीमान्त शेतक-यांच्या दृष्टीने अकर्षक ठरणा-या किमतीला त्यांच्या जवळील जमिनी मोठया जमीनमालकांकडून खरेदी करण्यात आल्या परिणामत: जमिनीचे मालकी हक्क काही थोडया लोकांच्या हाती संकेंद्रित होऊ लागले. आणि मोठया जमीनमालक व लहान शेतकरी तसेच जमीनमालक आणि कुळे, जमीनमालक आणि शेतमजुर याच्यामध्ये संघर्ष निर्माण होऊ लागला आहे. ज्या भागातील जमिनींना सार्वजनिक सिंचन प्रकल्पांपासून पाणी पुरवठा होतो आणि ज्या भागातील शेतीक्षेत्रात नविन उधोगविधा वापरण्यात आली आहे अशा भागांत ह्या प्रवृती प्रकर्षाने दिसून येतात. आर्थिक व राजकीय दडपणामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवन विस्कळीत होऊ नये ह्यासाठी त्या अनिष्ट प्रवृत्तीची गंभीर दखल घेणे भागपडले.

धारणक्षेत्रावर कमाल मर्यादा घालण्याची भाषा सन १९५१ पासून बोलली जाऊ लागली पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मसुधात असे म्हणटले आहे "व्यक्ती किती जमीन धारण करु शकते ह्यावर निरपेक्ष मर्यादा असणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक ठरते" विषमता कमी करण्याच्या आणि सहकारी ग्रामीण अर्थ व्यवस्था विकसित करण्याच्या आवश्यकतेवर दुस-या योजनेने ही बराच भर दिला आहे अशा रीतीने १९५८ ते १९६२ ह्या काळात भारतातील बहुतक घटक राज्यात धारणक्षेत्रावर कमाल मर्यादा घालणारे कायदे करण्यात आले आहेत.

तक्ता क्रमांक २.१

| घटक राज्य | धारण क्षेत्रावरील कमाल मर्यादा [एकर] | कमाल मर्यादा ज्या कि परिमाणाला लागू कर वयाची ते परिमाणाल |
|---|---|---|
| आंध्र | २७ ते ३२४ | भू-धारण |
| आसाम | २५ | " |
| बिहार | २० ते ६० | कुटुंबातील सर्व व्यक्ती |
| हरयान | २७ ते १०० | भू- धारक |
| हिमाचल | २७ ते १०० | " |
| जम्मू काश्मीर | २२३/४ | " |
| केरळ | १२ ते १५ | कुटुंबातील सर्व व्यक्ती |
| मध्ये प्रदेश | २५ ते ७५ | भू-धारक |
| महाराष्ट्र | १६ ते १२६ | " |
| म्हैसूर | २७ ते २१६ | कुटुंबातील सर्व व्यक्ती |
| ओरिसा | २० ते ८० | भू-धारक |
| पंजाब | २७ ते १०० | " |
| राजस्तान | २२ ते ३३६ | कुटुंबातील सर्व व्यक्ती |
| तामिळनाडू | १२ ते ६० | " |
| उत्तर प्रदेश | ४० ते ८० | भू- धारण |

आधार - भारतीय अर्थ व्यवस्था

**३] पत पूरवठा:**

शेती व्यवसाय प्रगतशील करावयाचा असेल तर शेती व्यवसायाला लागणारा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे पत पूरवठा होय. शेतक-याना जमिन मिळवून दिली केली गेली तरी त्याला लागणार भांडवली खर्च करण्यासाठी लहान शेतक-याकडे पैसा नसतो त्यासाठी त्याला पूरेसे कर्ज दिल्या शिवाय त्यांची अर्थीक स्थिती सुधारणे कठीन आहे. शेतक-याला तिन प्रकारे कर्ज पुरवण्याची अवश्यकता लागते.

१] अल्प मुदत
२] मध्यम मुदत
३] दिर्घ मुदत

३.१] अल्प मुदत :- अल्प मुदत म्हणजे सर्वसाधरण। १५ महिन्यासाठी शेतक-याला कर्जाची गरज असते. त्यांना बि-बियाने, खते, आणि अन्न शेतकी अदानांची गरज आसते त्यासाठी त्यांना अल्प मुदतीचा कर्ज पुरवठा अवशक्य आसतो जेव्हा पिक हानी येते तेव्हा त्या पैसाची परत फेड केली जाते..

**३.२ मध्यम मुदत:**

सुमारे १५ महिने ते ५ वर्षे या दरम्यानच्या मुदतीची कर्जे होत. अशी कर्जे घेऊन ती शेती साठी लागणारी मोठी अवजारे घेतात गुरेढोरे, विहीर खोदण्यासाठी तसेच बायबंधारे घालण्यासाठी अशा कर्जाची गरज लागते.

**३.३ दिर्घ मुदतीची कर्जे:**

पाच वर्षांच्या मुदतीसाठी किंवा त्याहून अधिक मोठ्या मुदतीसाठी अशी कर्ज घेतली जातात ह्या कर्जाची मुदत अत्यंत दिर्घ असते. ही कर्जे अत्यंत मोठ्या रक्कमेची असतात जुनी कर्जे फेडणे, ट्रॅक्टर, जादा जमिन खरेदी साठी अशा कर्जाची आवश्यकता लागते.

**३.४ शेतक-याला आवश्यक असलेल्या कर्जांचा संबंधीचे अंदाज.**

अखिल भारतीय ग्रामीण पत पुनर्वि लोकन समितीने (All India rural credit reviews comitte.)
सन १९६९ मध्ये सादर केलेल्या अहवालात असा अंदाज व्यक्त केला. आहे की, चौथ्या योजनेच्या शेवटच्या वर्षात [ म्हणजे सन १९७३-७४] मध्ये अल्पमुदत शेतकी कर्ज विषयक गरज २,००० कोटी रु असणेचे संभवते चौथ्या योजनेच्या काळात मध्यम मुदतीच्या व दिर्घ मुदतीच्या कर्जाची गरज प्रतिवर्षी ५०० कोटी रु राहतील.

हे अंदाज १९६९ मध्ये करण्यात आले पण सन १९७० पासून शेतीव्यवसायन नवनवीन शेतकी उद्योगविद्या [ डावपेच] वापरण्यात आले उदा: सुधारीत बि-बियाणे खते, पाण्याचा पुरवठा ह्या मुळे १९६९ मध्ये करण्यात आलेल्या अंदाजा पेक्षा त्या नंतरच्या वर्षात शेतक-याच्या कर्ज विषयी गरजा ब-याच प्रमाणात वाढल्या.

---

तक्ता क्रमांक २.२ [ टक्के]

| पत पुरवठा करणारे घटक | सन १९५१/५२ | सन १९६१/६२ | सन १९७१ | सन १९८१ | |
|---|---|---|---|---|---|
| सावकार | ६९.७ | ४९.२ | ३६.१ | १६.१ | |
| व्यापारी अडत | ५.५ | ८.८ | ८.४ | ३.२ | |
| नातलग | १४.२ | ८.८ | १३.१ | ८.७ | |
| जमिनदारी/इतर | ३.३ | १४.५ | १०.७ | ८.८ | |
| सह. संस्था | ३.१ | १५.५ | ७.१ | ३.९ | |
| व्यापारी बँका | ०.९ | ०.६ | २.६ | २९.४ | |
| सरकार | ३.३ | २.६ | २२.० | २९.९ | |

Source. Indian Economic Dutt Sundharam.

वरील तक्ता क्रमांक २.२ वरून असे दिसून येते की सन १९५१/५२ नंतर सावकारा कडून घेतले जाणारे कर्ज कमी होऊ लागले त्याचे कारण स्थापित संस्थानी [सहकारी-संस्थानी] व्यापरी बँक, सरकार यांनी शेतक-याना मोठया प्रमाणात कर्ज दिले.

| कर्ज प्रकार | १९५०/५१ | १९६०/६१ | १९७०/७१ | १९८०/८१ | १९८७/८८ |
|---|---|---|---|---|---|
| अल्प मुदत | २२.९ | १८३ | ५१९ | १५२६ | ३२८८ |
| मध्यम | [क] | २० | ५९ | २३७ | ३२७ |
| दिर्घ | १.३ | ११ | १०१ | ३६३ | ७१९ |
| एकूण | २४.२ | २१४ | ६७९ | २१२६ | ४३४४ |

Source - Indian economic information year book 1989/90
क - उपलब्ध नाही

४]x~~र्ज~~ सिंचन सोयी:

कोणत्याही देशात शेतीच्या विकासाठी पुरेशा व नियमित पाणी पुरवठा अवशक्य आहे. भारता सारख्या देशात अपूरा पाऊस व अनिश्चित पाऊस आसल्या मुळे उत्पादनात मोठया प्रमाणात घट होते. भारतीय शेती व्यवसाय पावसावर इतक्या मोठया प्र माणावर अवलंबून आहे की एखादया ~~बव~~ वर्षी पाऊस असमाधानकारक झाल्यास भारतीय शेतीव्यवसाय बुडतो नैसर्गिक बदलाचे ५ वर्षाचे (चक्र कार्यरत असते) ~~असल्यास~~ सर्वसाधारण पणे असे आढळून येते की दोन वर्षे पाऊस अनुकूल असतो, एक वर्ष सर्वसाधारण व दोन वर्षे निश्चित पणे प्रतिकूल राहतो.

भारतात अनेक भागात पाऊस अपूरा व अनिश्चित असल्याचे आढळते. अशा प्रदेशात शेतमालाचे सध्या जितके उत्पादन केले जाते त्यापेक्षा अधिक उत्पादन केले जाण्यासाठी कालव्याद्वारा मार्गाने पाणी पूरवठा करणे अतिशय निकडीचे ठरते. भाद्रूळ व ऊस हया सारख्या पिकांना विपूल व नियमीत पाणी पुरवठा होणे जरूरीचे ठरते भारतात बहुतेक भागांत सध्या वर्षातून सर्वसाधरणपणे एकच पीक काढले जाते, जर अशा ठिकाणी सिंचन सोयी उपलब्ध करण दिल्यास दोन किंवा तिन पिके काढता येणे शक्य आहे. या मूळे सिंचन सोई ~~करणे~~ करणे अत्यंत महत्वाचे आहे. भारतात जर का मोठया प्रमाणात सिंचन सोई उपलब्ध करून दिल्यातर अत्यंत अन्न-धान्याचे उत्पादन मोठया प्रमाण होऊन अन्न-धान्य प्रश्न कमी होईल.

सिंचन सोई उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन बध्द प्रयत्न करण्यात आले असून १९८९-९० पर्यंत ७८ दशलक्ष हेक्टर जमिनीला सिंचन सोई उपलब्ध होत्या.

भारतीय शेतीला विहरी, कालवे बोरवेल, व नदया, तलाव या पासून सिंचन पुरवठा हातो. १९५०/५१ व १९८२/८३ साली या मार्गाने मिळालेला सिंचन सोई.

तक्ता २/४

| | १९५०/५१ | | १९८२/८३ | |
|---|---|---|---|---|
| सिंचन सोईचे मार्ग | दशलक्ष हेक्टर | टक्केवारी | दशलक्ष हेक्टर | टक्केवारी |
| कालवे, विहरी | ८.३ | ४० | १५.५ | ३८ |
| बोरवेल | ६.० | २९ | १९.० | ४८ |
| टॅंक | ३.६ | १७ | ३.१ | ८ |
| इतर मार्ग | ३.० | १४ | २.४ | ६ |
| | २०.९ | १०० | ४०.० | १०० |

Source - Indian Economy Datta Sundharam.

भारतातील सिंचन सोईचे तिन विभागात विभाजन केले आहे.

४.१] मोठे [ major ] १०,००० चे वरती सिंचन सोई मुक्त.
४.२] मध्यम [ medium ] २,००० ते १०,००० हेक्टरपर्यंत सिंचन सोई मुक्त
४.३] लहान [ minor ] २,००० हेक्टर पर्यंत.

सिंचन सोईचा विकास

[ दशलक्ष हेक्टर ]

| | मोठे/मध्यम/प्रकल्प | लहान प्रकल्प | सर्व मिळून |
|---|---|---|---|
| १९५०/५१ | १० | १३ | २३ |
| १९८०/८१ | २७ | ३१ | ५८ |
| १९८५/८६ | ३१ | ३९ | ७० |
| १९८९/९० | ३३ | ४५ | ७८ |
| | ५९ | ५५ | ११४ |

Source - Indian Economy Datta Sundharam.

या वरून असे दिसून येते की १९५०/५१ ला जेवढे क्षेत्र मोठ्या, मध्यम, लहान प्रकल्पावर आवलंबून होते तेच १९८९/९० पर्यंत तिप्पटी पेक्षा जास्त झाले हे दिसून येते.

सिंचन सोई करण्या साठी प्रत्येक पंचवार्षीक योजनेत केला जाणारा खर्च व

सिंचन सोई करण्यासाठी प्रत्येक पंचवार्षीक योजनेत केला जाणारा खर्च व सिंचन खाली आलेली जमिन.

तक्ता क्रमांक २.६

| पंचवार्षिक योजना | खर्च कोटीत | सिंचन खाली अलेली जमिन दश. ल. [हेक्टर] |
|---|---|---|
| पहिली | ४५० | २६ |
| दुसरी | ५२० | २९ |
| तिसरी | ९१० | ३४ |
| चौथी | १७५० | ४४ |
| पांचवी | ३०७० | ५२ |
| सहवी | ९३२० | ६८ |
| सातवी | १४३६० | ८० |

source- seventh five year plan.

५] सहकारी शेती:-

सहकारी शेतीचा पुरस्कार हे भारताच्या राज्संस्थेचे अधिकृत धोरण आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. भारतातील अधिकारारुढ कॉंग्रेस पक्षाच्या शेतकी सुधारणा समिती [ Agrarian reforms comitte of Indian National congress. ] ने आपल्या अहवालांत अशी शिफारस केली की. भू-धारणेसाठी किमान व कमाल मर्यादा पेक्षा कमी ज्यांची शेती आहे त्याच्यासाठी सहकारी संयुक्त शेतीची योजना करण्यात यावी मलाल मर्यादेपेक्षा अधिक मालकीची शेती कोणाचीही असु नये ज्याची शेती कमाल मर्यादा हयांच्या दरम्यान आहे त्यांना कौटुंबिक मालकी चालु ठेवण्याची मुभा असावी व त्यांच्या साठी सहकारी कामगि-याची सेवा करण्यांत यावी भूधारणाची कमाल व किमान मर्यादा निश्चित करण्यासाठी समीतीने आर्थिक भूधारण [ ] ही कल्पना पुढे मांडली व अर्थिक मर्यादेच्या एकतृतीयांश ही किमान मर्यादा व आर्थिक मर्यादेच्या तिप्पट ही कमाल मर्यादा मानण्यात यावी असे सुचविले सर्वसामान्य आकाराच्या शेतकरी कुटुंबाला आणि निदान एका बैलजोडील भरपूर काम देणारा व शेतकरी कुटुंबाला रास्त रहाणीमानाची हमी देणारा जमिनीचा तुकडा ही भू-धारणाची आर्थिक मर्यादा होय असे मत समितीने व्यक्त केले.

भारताच्या नियोजनांत सहकरी शेतीला प्रथमापासूनच स्थान देण्यांत आले आहे. पहिल्या योजनेत सहकारी ग्रामसंघटना [ co-operative village management ] हे साध्य ठरविले असून त्यासाठी करावयाच्या वाटचालीचा एक भाग म्हणून छोट्या व मध्यम शेतक-याना खुषीने सहकारी शेती संस्था स्थापन करण्यासाठी व चालविण्यास उत्तेजन व सहाय्य द्यावयाच्या धोरणाचा पुरस्कार केला आहे. कोणत्याही खेडयात सहकारी शेती एकदा सुरु झाली की खेडयात लागवड केलेली सर्व जमीन सहकारी शेतीच्या कक्षेत आणली जाईल असा विश्वासही पहिल्या योजनेत व्यक्त केलेला आढळतो खेडयातील बहुसंख्य मालकांनी व कुळांनी सहकारी शेतीला मान्यता दिल्यास उरलेल्याना सहकारी शेतीत येण्यास भाग पाडणे अयोग्य नाही असा अभिप्रायही पहिल्या योजनेत आढळतो

दुस-यायोजनेत सहकारी ग्रामसंघटन हया साध्याचा पुनरुच्चार कर यांत आला असून पुढील दहा वर्षांत शेतीचा बराच मोठा भाग सहकरी शेतीखाली यावा या हेतुने सहकारी शेतीच्या पायासुध्दा विकासाची तयारी करणे व सहकारी शेतसाठी लक्ष्ये ठरविणे हा दुस-या योजनेच्या काळांतील कार्यक्रम असावा असे सुचविण्यात आले आहे. दुस-या पंचवार्षिक योजनेच्या अखेरेस सर्वसाधारण पणे ५००० ठिकाणी सहकारी शेतीचे प्रयोग चालु असावेत. हया दिशेने प्रयत्न करण्यात यावे असा राज्य सरकारांच्या सहकार मंत्र्यांच्या परिषदेत जुलै १९५६ मध्ये मजुरी निर्णय घेण्यात आला.

भारतात सहकारी शेतीचे एकूण चार प्रकार पडतात.

५.१ सहकारी कुळ शेती पध्दती
५.२ सहकारी संयुक्त शेती पध्दती
५.३ सहकारी सुधार शेती पध्दती
५.४ सहकारी सामूहिक शेती पध्दती.

५.१ <u>सहकारी संयुक्त शेती पध्दती</u>: हया पध्दतीनुसार अनेक लहान जमीन मालक एकत्र येऊन शेतीव्यवसाय करतात त्याच्या मालकीचे धारण क्षेत्र एकत्र केली जाऊन त्या धारण क्षेत्राचे एक परिचालन परिमाण केले जाते लागवडीचे व व्यवस्थापनाचे कार्य सभासद शेतक-याकडून सु सु संयुक्त रीतीने केले जाते. या पध्दतीत सभासदांनी केलेल्या कामाबदल सभासदांना वेतन मिळते. आणि अशा सहकारी संयुक्त शेती संस्थेला नफा झाल्यास त्या नफ्याचे वाटप सभासदाना केले जाते.

५.२ सहकारी कुळ शेती पध्दती:-

हया पध्दतीत शेतीचे भाग पाडून ते शेतक-याना खंडाने कसण्यासाठी दिले जातात सहकारी कुळ शेती संस्थेचे तयार केलेल्या नियमानुसार त्या शेतक-यांना बि-बियाणे

खते, औजारे वगैरे गोष्टीची उपलब्धता करून दिल्या जातात. जेथे नव्या जमिनीचे उद्धरण करून ती लागवडी खाली आणली जाते अशा ठिकाणी सहकारी कुळ शेती संस्था स्थापन करणे योग्य ठरते.

५.३] सहकारी सुधारण शेती पध्दती:

मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळविण्यापेक्षाही शेती व्यवसायात सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूने सहकारी सुधार शेती संस्था स्थापन केली जाते अशी सुधार संस्था आपल्या सभासद शेतक-यांना उत्तम प्रकारचे बी-बियाने, उत्तमखते, अवजारे उपलब्ध करून देणे त्याच प्रमाणे सभासदाच्या शेतमालाची विक्रीव्यवस्था त्या संस्थेकडून केली जाते.

५.४] सहकारी सामुहिक शेती पध्दती:

या पध्दतीनुसार जमिनीची मालकी सहकारी संस्थेकडे राहते आणि ती संस्था अशी जमिन पदयाने देते आणि अशा रीतीने त्या जमिनिच्या लागवडीचे काम केले जाते अशा संस्थेच्या सभासदांकडून केल्या जाणाऱ्या कामाबद्दल सभासदांना मजुरी दिली जाते. अशा ह्या संस्थेला मिळणा-या नफ्याच नफ्याचे वाटप सभासदांमध्ये सभासदांच्या मजुरीच्या मंजुरीच्या प्रमाणात केले जाते.

५.५] सहकारी शेतीच्या संस्थाची प्रगती:-

भारतात वरील प्रकारच्या सहकारी संस्थांनी पहिल्या आणि दुस-या पंचवार्षिक योजनांच्या काळात काही प्रगती केल्याचे आढळून येते तिस-या योजनेच्या काळात ३,१८० मार्ग दर्शी सहकारी शेती संस्था [ Pilot co-operative Farming society ] स्थापन करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले होते प्रत्यक्षात मार्च १९६६ अखेर ३,७४९ मार्गदर्शी सहकारी शेती संस्था स्थापन करण्यात आल्या त्या संस्थाची एकूण सभासद संख्या ५७,६६४ होती त्यांच्या कक्षेतील एकूण जमीन २.७७ लक्ष एकर होती सन १९६९ च्या दरम्यान भारतातील एकूण सहकारी शेती संस्थाची संख्या ८,१४३ होती ती ३० जून १९७० पर्यंत ८,८१९ सहकारी शेती संस्थाची संख्या झाली त्यांचे एकूण सभासद २ लाख ४१ हजार होते. सर्वाधिक सहकारी शेती संस्था उत्तर प्रदेश मध्ये स्थापन करण्यात आल्या असून त्या खालोखाल महाराष्ट्र, म्हैसूर पंजाब, मध्य प्रदेश तामिळनाडू राजस्थान आणि अन्य घटक राज्ये ह्यामध्ये स्थापन करण्यात आल्या सहकारी शेती संस्थाचा कार्यक्रम आखण्याचे कार्य आणि त्या संस्था [illegible] वाढीस लावण्याचे कार्य राष्ट्रीय सहकारी शेती सल्लागार मंडळाकडून [ National co-operative Farming Adv. Board ] केले जाते भारतातील बहुतेक घटक राज्यांनी अशाच प्रकारच्या

सल्लागार संस्था स्थापन केल्या आहेत. परंतु भारतातील सहकारी शेती संस्थामध्ये मनोवृत्ति विषयक संघटनात्मक आणि उद्योगविद्याविषयक अशा विविध प्रकारच्या उणिव असल्याचे आढळून येते. जवाहरलाल नेहरू ह्याच्या सारख्या नेत्याची सहकारी शेतीवर बराच भर दिला असला तरी भारतातील सहकारी शेती संस्थानी फारशी प्रगती केलेली नाही, ही गोष्ट मान्य करावी लागते सन १९७० मध्ये प्रसिध्द झालेल्या चौथ्या योजनेच्या मसुद्यात असे मोकळेपणाने व प्रामाणीकपणे मान्य करण्यात आले की व सहकारी शेती क्षेत्रात आतापर्यंत कोणतीही विशेष प्रगती केली गेलेली नाही या संदर्भातील प्रेरणेचा प्रश्न आणि संघटनाचा प्रश्न हे प्रश्न अद्याप यशस्वी रीतीने मोठ्या प्रमाणावर सोडविण्यात आलेले नाहीत आणखी असे की सहकारी शेतीला देशातील लोक-मनाचा पाठिंबा मिळालेला नाही म्हणून सहकारी शेतीला प्रोत्साहन देण्याच्या सध्याच्या योजनाचालू ठेवण्याखेरीज दुसरे जादा कार्यक्रम सुचवले नाहीत प्रत्येक योजनेस सहकारी शेतीला प्रोत्साहन देणे एवढेच ठरविण्यात आले.

४] अन्न-धान्य व्यवस्था.

देशातील लोकांना पुरेसे अन्न उपलब्ध करुन देणे हे जगातील बहुतेक सर्व विकसनशील देशातील आर्थिकनियोजनाचे सर्वाधिक महत्त्वाचे उद्दिष्ट होय अन्न-धान्याचे नुसते उत्पादन करुन चालणारनाही तर जे वाटप केले जाणे अवश्यक ठरते. सन १९७० मध्ये हेग येथे भरलेल्या द्वितीय जागतिक अन्न परिषदेच्या अंतिम घोषणेची सुरुवात पुढील विधानाने होते "अन्न ही प्रत्येक मनुष्याप्राण्याची पहिली गरज होय हा मानवाचा एक मुलभूत हक्कच होय पण जगातील कोट्यावधी लोकांच्या बाबतीत ती गरज भागविली जात नसल्याचे दिसून येते आणि तो हक्क त्यांना नाकारला जात आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अन्नधान्याविषयक किमान गरजा जो पर्यंत भागविल्या जात नाहीत तो पर्यंत त्या व्यक्तीला आर्थिक नियोजनाचे महत्त्व पटणे शक्य नाही. म्हणून फोर्ड अभ्यासन शेतकी उत्पादन संघाने [ Ford Foundation Agricultural production team. ] असे यथार्थतेने घोषित केले आहे की " पुरेशा अन्नाच्या अभावी मानवी कल्याण सामाजिक न्याय आणि लोकशाही या गोष्टी प्राप्त करुन घेणे भारताला जवळ,जवळ अशक्य होईल."

भारतातील अन्न-धान्याची टंचाई पाहून १९४७ ला भारत स्वतंत्र झाला नंतर १९४७ मध्ये द्वितीय अन्नधान्य धोरण समिती नेमली त्या समितीने असे सुचवलेली:

१] भारतातील अन्न-धान्याची आयात पध्दतशीर व नियोजित टप्प्यां मध्ये बंद केली जावी.

२] अन्न-धान्याच्या बाबतीत शासनाने स्विकारलेली लोकांची बांधलिकी योजनाबध्द टप्प्यांत कमी करुन शेवटी ती पूर्णपणे संपुष्टांत आणली जावी.

१९५७ च्या अन्न अन्नधान्याच्या बाबतोतोल विनियंत्रणाच्या धोरणामुळे प्रतिकूल परिणाम घडून येऊन सरकारच्या पदरो निराशा झालो विनियंत्रणाचे धोरण अयशस्वो झाल्याने सरकारणे त्या धोरणाऐवजो नियंत्रणाचे व अन्न-धान्याच्या नियंत्रित शिधा वाटप पध्दतोचे धोरण अंगोकारले.

भारतातोल अन्न-धान्य समस्या आटोक्यात येणे कठोण झाल्याने भारत सरकारने सन १९५० मध्ये" अन्न धान्य अधिप्राप्तो समिती" चो नेमणूक केलो १९५० च्या समितिने पूर्ण नियंत्रणाच्या धोरणाचो शिफारस केलो अन्न-धान्याच्या बाबतोतील. मुक्त बाजार पध्दतो संपूर्णपणे बंद करावो आणि त्या ऐवजो सांविधिक नियंत्रित शिधा वाटप पध्दतोचा सरकारने अवलंब करावा असे १९५० च्यासमितोने सुचवले पण सरकारचे हे धोरण सुध्दा अयशस्वो झाले अन्न-धान्या करोता मागणो वाढू लागलो त्यामुळे किंमती वाढु लागल्या अन्न-धान्याचे उत्पादन कमी मागणी जास्त त्यामुळे परदेशातुन अधिक धान्य आयात करणे भाग पडले.

सरकारला अन्न-धान्याच्या बाबतोत स्वयंपूर्णता होण्यासाठो पंचवार्षोक योजनाचो नियुक्ती करण्यात आलो आणि पहिलो योजना १ एप्रिल १९५१ पासून सुरवात करण्यात आलो पहिल्या योजनेच्या काळात पाऊस समाधानकारक झाल्याने आणि नैसर्गिक परिस्थोनो अनुकूल राहिल्याने भारतातोल अन्न-धान्याचे उत्पादन वाढले व भारतातोल. अन्न-धान्याच्या किंमती कमो झाल्या १९५३ पासून किंमतो कमो होऊन तथा किंमती २५ टक्क्यांनो कमो झाल्या पहिल्या योजनेच्या काळात भारत अन्न-धान्याच्या बाबतोत स्वयंपूर्ण झाला असला तरो ती परिस्थितो कायम टिकलो नाहो. १९५६ मध्ये पाऊस असमाधानकारक झाला आणि उत्पादन कमो झाले त्यामुळे किंमतो वाढू लागल्या नंतर सन १९५८-५९ मध्ये तर अन्न-धान्याच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले अन्न-धान्याचे उत्पादन त्या काळात वाढून हो अन्न-धान्याच्या किंमतो वाढल्या वाढल्या त्या किंमतो जवळ जवळ ४१ टक्क्यांनो वाढल्या. अन्न-धान्याचे साठे असून सुध्दा या काळात किंमतो वाढल्या त्यांचे महत्वाचे कारण म्हणजे परिचलनातोल पैशात वाढ घाऊक व किरकोळ व्यापारा कडून केलेले साठेबाजोचे व सट्टेबाजोचे व्यवहार आणि कांहो प्रमुख पिकांच्याउत्पादनात घट.

सन १९६६ मध्ये आखण्यात आलेले अन्न विषयक धोरण तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पूर्ण अयशस्वो ठरले. तिसऱ्या योजनेच्या विशेषत: शेवटच्या दोन वर्षात भारतातोल अन्न-धान्याचे उत्पादन बरेच घटले काळ्या पैशातहो वाढ-वाढ घडून आलो सट्टेबाजोला प्रोत्साहन मिळाले होते. त्यामूळे याकाळात किंमतो जवळ जवळ ५० टक्याने वाढल्या त्या काळात सार्वजनिक वाटप व्यवस्थेसाठो अमेरिकेतून अन्न-धान्याचो भरपूर आयात केलो जात असतानाहो किंमतोत बेरमसाठो वाढ झालो.

सन १९६६ मध्ये "अन्न-धान्य धोरण चौकशो" समितो नेमण्यात आलो अन्न-धान्याचा प्रश्न अभ्यासणे आणिसरकारला योग्यधोरणाचो शिफारस करणे हो कामे त्या

समितीकडे सोपवण्यात आली सन १९६६ च्याअन्नधान्याधोरण समितीच्या शिफारशी भारत सरकारने स्वीकारल्या.

सुदैवाने सन १९६७-६८ पासून अन्न-धान्याचे देशान्तर्गत उत्पादन वाढू लागले. त्यामूळे अन्न-धान्याची आयात कमी करता येणे शक्य झाले आणि सुमारे ८ दशलक्ष टनाचा शिलकी साठा[Buffer stock.] राखता येणे शक्य झाले.

सन १९५१ ते सन १९९० पर्यंत म्हणजे पहिल्या योजणे पासून सातव्या योजने पर्यंत प्रत्येक योजनेत अन्न-धान्याचे व इतर पिकांचे ठरवलेले लक्ष्य किती व प्रत्यक्ष प्रत्यक्षात उत्पादन किती हे तक्ता क्रमांक २.७वर पाहा.

## प्रत्येक पंचवार्षीक योजनेतील अन्य-धान्य इतर पिकांचे उत्पादन.

[illegible] तक्ता २.७

| पंचवार्षीक | अन्नधान्य | | तेलबीया | | ऊस | | कापूस | | ताग व | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्ये | प्रत्यक्ष | लक्ष्ये | प्रत्यक्ष | लक्षे | प्रत्यक्ष | लक्षे | प्रत्यक्ष | लक्ष्य | प्रत्यक्ष |
| पहिली | ६२ | ६७ | ५.५ | ५.६ | ६३ | ६० | ४.२ | ४.० | ५.४ | ४.२ |
| दुसरी | ८१ | ८० | ७.६ | ६.५ | ७८ | १०४ | ७.५ | ५.४ | ६.५ | ४.० |
| तिसरी | १०० | ७२ | ९.८ | ८.४ | १०० | १२७ | ७.० | ४.६ | ६.२ | ४.५ |
| चौथवी | १२९ | १०४ | १०.५ | ८.७ | १५० | १४० | ८.० | [illegible] | ७.४ | ६.२ |
| पाचवी | १२५ | १२६ | १२.० | ८.९ | १६५ | १६५ | ८.० | ७.१ | ७.७ | ७.१ |
| साहवी | १५४ | १४६ | ११.१ | १३.० | २१५ | १७० | ९.२ | ८.५ | ९.१ | ७.८ |
| सातवी | १८० | १७२ | १८.० | १७.० | २१७ | २१० | ९.५ | १०.५ | ९.५ | ७.९ |

Source → Indian Economy Dutta - Sundharam.

एकदरीत पहाता अन्न-धान्याचे उत्पादन चौथ्या योजनेपासून समाधानकारक आहे. चौथ्या योजनेपासून ठरवलेली लक्ष्ये जवळ जवळ पूर्णकेली आहेत. पाचव्या योजनेत तर अन्न-धान्याचे उत्पादन ठरवलेल्यालक्ष्या पेक्षा जास्त झाले आहे.

या वरून असे दिसून येते की स्वातंत्र्यानंतर पंचवार्षीक योजनेच्या काळात भारतीय शेतीचा विकास भरपूर झालेला आढळून येतो.